PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Paij Lagnachi
Year: 1998

Song: Aajkal Pori Sarya
Lyricist: Jagdish Khebudkar

आजकाल पोरी साऱ्या गेल्या बिघडून
काय तुला मिळतं हे रीत मोडून
आजकाल पोरी साऱ्या गेल्या बिघडून
काय तुला मिळतं हे रीत मोडून
पडदा लाजचा डोळ्यावर घे
ताळ्यावर ये गं पोरी ताळ्यावर ये
ताळ्यावर ये गं पोरी ताळ्यावर ये

आजकाल काकूबाई बोलते चिडून
संस्काराच्या पिंजऱ्यात बांधलं जखडून
आजकाल काकूबाई बोलते चिडून
संस्काराच्या पिंजऱ्यात बांधलं जखडून
जुनं टाकून नवीन घे
ताळ्यावर ये गं तूच ताळ्यावर ये
ताळ्यावर ये गं तूच ताळ्यावर ये

दृष्ट लागंल असं हे रूप
फुलावाणी ही नाजूक काया
ब्रम्हदेवाचं नक्षीकाम
अशा करणीनं जाईल वाया
कापून टाकले तू रेशमाचे केस गं
साडी फेकून केला पुरूषाचा वेष गं
कापून टाकले तू रेशमाचे केस गं
साडी फेकून केला पुरूषाचा वेष गं
नारी धर्म गेला तुझी संगत सोडून
काय तुला मिळतं हे रीत मोडून
आगं नारी धर्म गेला तुझी संगत सोडून
काय तुला मिळतं हे रीत मोडून
पडदा लाजंचा डोळ्यावर घे
ताळ्यावर ये गं पोरी ताळ्यावर ये
ये ताळ्यावर ये गं पोरी ताळ्यावर ये

गेलं विसावं शतक मागे
पॉप संगीत उडवी दंग
नव्या युगानं किमया केली
स्त्रीमुक्तीला आली झिंग
घेतो भरारी आमचा तरूणपणा गं
तुळशीला घाल जा तू प्रदक्षिणा गं
घेतो भरारी आमचा तरूणपणा गं
तुळशीला घाल जा तू प्रदक्षिणा गं
आजकाल फॅशनचं वादळ उठून
चाल रीत तुझी सारी जाईल उडून
आजकाल फॅशनचं वादळ उठून
चाल रीत तुझी सारी जाईल उडून
जुनं फेकून नवीन घे घे घे
ताळ्यावर ये गं तूच ताळ्यावर ये
अगं ताळ्यावर ये गं तूच ताळ्यावर ये

लुटूपुटीच्या लावून पैंजा
भेंडया लावतायं मारतायं गप्पा

PlanetRead
Literacy for a Billion

काय आईला म्हणताय मम्मी
काय बापाला म्हणताय पप्पा
जिजामातेला ताराराणीला आठवा
शूर मर्दानी झांशीवालीला आठवा
जिजामातेला ताराराणीला आठवा
शूर मर्दानी झांशीवालीला आठवा
पराक्रमाची त्यांच्या नशा चढून
जिंकावी पैज अशी इर्ष्या करून
पराक्रमाची त्यांच्या नशा चढून
जिंकावी पैज अशी इर्ष्या करून
पडदा लाजंचा डोळयावर घे
ताळयावर ये गं पोरी ताळयावर ये
ताळयावर ये गं पोरी ताळयावर ये
ताळयावर ये गं पोरी ताळयावर ये
ताळयावर ये गं पोरी ताळयावर ये
ताळयावर ये गं पोरी ताळयावर ये
ताळयावर ये गं पोरी ताळयावर ये

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*